# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**


**नोंदणीकृत कार्यालय :**

बॅरेक नं.१८,
सचिवालय जिमखान्याच्या मागे,
बॅकबे रिक्लेमेशन,
मुंबई-४०० ०२१.
दूरध्वनी क्र. २२०२३७११
फॅक्स क्र. २६७१३५६३

**मुख्य कार्यालय :**

जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर,
गुलमोहर क्रॉस रोड नं.९,
जे.व्ही.पी.डी. स्कीम, जुहू,
मुंबई-४०० ०४९.
दूरध्वनी क्र. २६२००३५१/ २६२०२८५२
E-mail: mahatma.phule@yahoo.in


क्रमांक- उमवा/ प्रशासन/ ४७६ /२०१७      दिनांक -- ३१.५.२०१७

**विषय — महामंडळाच्या व जिल्हा कार्यालयामध्ये वर्ग ३ व ४ श्रेणीचे मनुष्यबळ पुरविण्याच्या अनुषंगाने बाह्यसंस्थेव्दारे करार पद्धतीने मनुष्यबळ पुरवठा करण्याच्या अनुषंगाने निविदा धारकांची पूर्व बैठकीबाबत.**

महामंडळाच्या मुख्यालय, प्रादेशिक कार्यालय व जिल्हा व्यवस्थापक कार्यालयामध्ये वर्ग - ३ व ४ श्रेणीचे मनुष्यबाळ पुरविण्याच्या अनुषंगाने बाह्यसंस्थेव्दारे करार पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता दिनांक २३.०५.२०१७ रोजी वेळ सकाळी १०.०० ते दिनांक ९.०६.२०१७ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून त्याबाबत दि.३१.५.२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता निविदा धारकांची पूर्व बैठक मुख्यालयात आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकीमध्ये सुमित फॅसिलिटीज, प्रा.लि.-पुणे यांचे प्रतिनिधी श्री विनोद राणे- अधिकृत सहीकरीता हजर राहिलेले असून त्यांनी ऑनलाईन लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रांपैकी अनुक्रमांक-२ मधील कंपनीस शासकीय कार्यालयामध्ये किमान २००० ते ४००० इतके मनुष्यबळ वर्ग-३ व ४ करीता पुरविण्याचा अनुभव असावा याबाबत आक्षेप घेतलेला असून त्याऐवजी कंपनीस शासकीय / निमशासकीय / खाजगी कार्यालयामध्ये किमान २००० ते ३५०० इतके मनुष्यबळ वर्ग ३ व ४ करीता पुरविण्याचा अनुभव असावा. सोबत पूर्तता केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे अशा स्वरुपाची लेखी स्वरुपात विनंती केलेली आहे.

मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयीन निवड समितीने याबाबत सविस्तर चर्चा केली असता निविदाधारकांच्या विनंतीचा विचार केला असता एखाद्या कंपनीस शासकीय कार्यालयामध्ये २००० ते ४००० इतके मनुष्यबळ वर्ग ३ व ४ करीता पुरविण्याचा अनुभव असण्याची शक्यता कमी असल्याने निवड प्रकियेमध्ये सदर विनंतीनुसार बदल केल्यास जास्तीत जास्त निविदाधारकांना भाग घेता येईल तसेच सदर निविदा प्रक्रिया जास्तीत जास्त पारदर्शक ठरेल असे एकमताने ठरविण्यात आलेले असून त्यास मा. व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्ष ई निविदा कार्यालयीन समिती यांनी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार ऑनलाईन लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रांपैकी अनुक्रमांक -२ मधील कंपनीस शासकीय / निमशासकीय / खाजगी कार्यालयामध्ये किमान २००० ते ३५०० इतके मनुष्यबळ वर्ग ३ व ४ करीता पुरविण्याचा अनुभव असावा सोबत पूर्तता केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे असा बदल करण्यात यावा व याबाबत sifynextender यांना जाहिर करण्यांत आलेल्या निविदेमध्ये उक्त नमूद केल्यानुसार बदल करण्याबाबत कळविण्यांत यावे असे ठरविण्यांत आले.

उपमहाव्यवस्थापक (प्रकल्प -२, ३)
सदस्य सचिव

उपमहाव्यवस्थापक (प्रशासन)
सदस्य

उपमहाव्यवस्थापक (वित)
सदस्य

उपमहाव्यवस्थापक (प्रकल्प - १)
सदस्य

व्यवस्थापकीय संचालक
मा.अध्यक्ष